Google ला सर्च करा

गुरुमाऊली

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

## इयत्ता – पाचवी ( 6 ऑगस्ट ) विषय – मराठी

Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

# दिवस सदतीस :

CLICK HERE



कविता वाचा व स्वाध्याय सोडवा.

टेस्ट सोडवा

कविता पहा

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कवितेत कोणत्या नदीचा उल्लेख केलेला आहे?

(आ) या नदीकाठच्या मातीचा प्रकार कोणता?

(इ) कवितेतील स्त्री सोजीचे लाडू कशात बांधणार आहे?

(ई) कवितेतील स्त्री सोजीचे लाडू घेऊन कोठे जाणार आहे?

**प्र. २. काय ते लिहा.**

(अ) ओटा बांधण्यासाठी उपयुक्त माती ............

(आ) लाडू बांधण्यासाठी उपयुक्त पीठ ............

(इ) बहिणीसाठी भाऊ आणणार असलेले वाहन ............

**प्र. ३. चिकणमाती बघून कवितेतील माहेरवाशिणीला एकातून एक कल्पना सुचत गेल्या. त्या कल्पना तुमच्या शब्दांत क्रमाने सांगा.**

**उपक्रम :** १. तुमच्या परिसरातील मातीचे वेगवेगळे नमुने गोळा करा. प्रत्येक नमुन्याचे वैशिष्ट्य व उपयोग माहीत करून घ्या. वर्गात सांगा.

२. नागपंचमीची गाणी, नवरात्रीतील भोंडल्याची गाणी अशा गाण्यांचा संग्रह करा.

### खेळूया शब्दांशी.

'नंदी' या शब्दातील 'न' या अक्षरावरील अनुस्वार लिहिताना, वाचताना विसरला, तर 'नदी' हा वेगळा शब्द तयार होतो. या शब्दाचा अर्थ मूळ शब्दापेक्षा वेगळा होतो.

नंदी – नदी अशा प्रकारच्या शब्दांच्या पाच जोड्या लिहा. त्यांतील शब्दांचे अर्थ सांगा.

### हे करून पाहा.

चिकणमातीपासून तुमच्या आवडीची खेळणी, किल्ला बनवा. यासाठी तुम्ही केलेल्या कृती क्रमाने सांगा.

### आपण समजून घेऊया.

#### सर्वनाम

सुधीर हुशार मुलगा आहे. सुधीरच्या बहिणीचे नाव सुमन आहे. सुधीर सुमनला 'सुमा' म्हणतो. सुमन सुधीरला 'दादा' म्हणते. सुधीर आणि सुमन एकाच शाळेत शिकतात. सुधीर आणि सुमन यांच्यात कधीच भांडणे होत नाहीत. सुधीर मोठा असल्याने सुधीर सुमनची काळजी घेतो.

वरील परिच्छेदात सुधीर आणि सुमन या भावंडांचे वर्णन आलेले आहे. सुधीर व सुमन या शब्दांऐवजी दुसरे शब्द वापरून तयार केलेला पुढील परिच्छेद वाचा.

सुधीर हुशार मुलगा आहे. त्याच्या बहिणीचे नाव सुमन आहे. तो तिला 'सुमा' म्हणतो. ती त्याला 'दादा' म्हणते. ते एकाच शाळेत शिकतात. त्यांच्यात कधीच भांडणे होत नाहीत. तो मोठा असल्याने तो तिची काळजी घेतो.

सुधीर आणि सुमन या नामांऐवजी आपण येथे 'त्याच्या, तो, तिला, ती, त्याला, ते, त्यांच्यात, तो, तिची' असे शब्द वापरले आहेत. या शब्दांना सर्वनाम म्हणतात.

टेस्ट सोडवा

## 4. गुणाकार व भागाकार

खालील भागाकार समजून घ्या.

### भागाकार

**सर :** आतापर्यंत आपण भागाकारासंबंधी काही बाबी शिकलो आहोत. जसं, भागाकार म्हणजे दिलेल्या संख्येची समान वाटणी करणं किंवा दिलेल्या संख्येतून एखादी संख्या पुन्हा पुन्हा वजा करणं. आणखी काही आठवतं का ?

**शुभा :** हो सर, एका गुणाकारावरून आपल्याला दोन भागाकार मिळतात.
$9 \times 4 = 36$, यावरून $36 \div 4 = 9$ आणि $36 \div 9 = 4$ हे दोन भागाकार मिळतात.

**सर :** शाबास ! आता भागाकार या क्रियेसंबंधी मूलत: नवीन शिकण्यासारखं असं काही नाही. फक्त भाज्य आणि भाजकातील अंकांची संख्या वाढत जाईल. तोंडी सांगा, $354 \div 6$ म्हणजे किती ?

**सारंग :** 354 म्हणजे $300 + 54$.
300 ला 6 ने भागले, की भागाकार 50 येतो आणि $54 \div 6 = 9$, म्हणून भागाकार $50 + 9 = 59$.

**सर :** बरोबर. आता आपण चार अंकी संख्येला एक अंकी संख्येनं कसं भागायचं, हे पायरी-पायरीनं शिकू. त्यासाठी 4925 ला 7 नं भागून भागाकार आणि बाकी किती येईल, हे सांगा.

**शुभा :** 4 हजार हे 7 गटांत हजाराच्या रूपात समान वाटता येणार नाहीत. 4 हजार = 40 शतक आणि पुढील 9 शतक असे 49 शतक वाटू. $49 \div 7 = 7$ म्हणून प्रत्येकाला 7 शतक मिळतील. आता 2 दशक 7 जणांत समान वाटता येत नाहीत, म्हणून भागाकारात दशकाच्या जागी शून्य लिहावं लागेल.
नंतर 25 ला 7 नं भागल्यावर भागाकार 3 येईल आणि बाकी 4, म्हणजे भागाकार 703, बाकी 4.

**सर :** शाबास ! आता $7439 \div 9$ हा भागाकार करा.

**सारंग :** तोंडी सोडवणं जरा कठीण आहे. मांडणी करून कागदावर सोडवतो.
भागाकार 826 आणि बाकी 5 आली.

```
   0826
9) 7439
  -0
   74
  -72
   23
  -18
    59
   -54
     5
```

**सर :** चार अंकी संख्येला दोन अंकी संख्येनं याच पद्धतीनं भागतात. भागताना गरज वाटली, तर भाजक संख्येचा पाढा तयार करून घ्यावा लागतो.

पुढे काही उदाहरणे सोडवून दाखवली आहेत. ती अभ्यासा.

**उदा. (1)**

```
    0170
25) 4254
   -0
    42
   -25
    175
   -175
    0004
   -0000
    0004
```

| |
|---|
| $25 \times 1 = 25$ |
| $25 \times 2 = 50$ |
| $25 \times 3 = 75$ |
| $25 \times 4 = 100$ |
| $25 \times 5 = 125$ |
| $25 \times 6 = 150$ |
| $25 \times 7 = 175$ |

भागाकार 170, बाकी 4

**उदा. (2)**

```
    0305
32) 9783
   -0
    97
   -96
     18
    -00
     183
    -160
      23
```

| |
|---|
| $32 \times 1 = 32$ |
| $32 \times 2 = 64$ |
| $32 \times 3 = 96$ |
| $32 \times 4 = 128$ |
| $32 \times 5 = 160$ |
| $32 \times 6 = 192$ |

भागाकार 305, बाकी 23

## Understand the following division.

### Division

**Teacher** : You have learnt some things about division. For example, we know that division means making equal parts of a given number, or, subtracting a number repeatedly from a given number. What else do you know?

**Shubha** : We know that we get two divisions from one multiplication.
From $9 \times 4 = 36$, we get the divisions $36 \div 4 = 9$ and $36 \div 9 = 4$.

**Teacher** : Very good! Right now, there's nothing new to learn about division. Only the number of digits in the dividend and the divisor will grow. Tell me what is $354 \div 6$ ?

**Sarang** : $354 = 300 + 54$. 300 divided by six is 50. And $54 \div 6 = 9$. Hence the quotient is $50 + 9 = 59$.

**Teacher** : Right! Now let's learn, step by step, how to divide a four-digit number by a one-digit number. So now, divide 4925 by 7 and tell me the quotient and the remainder.

**Shubha** : We cannot divide 4 thousands by 7 into whole thousands. Now, 4 Th = 40 H. So let us instead take the 40 hundreds together with 9 hundreds and divide 49 hundreds. $49 \div 7 = 7$. So, everyone gets 7 hundreds. Now, we cannot divide 2T equally among 7 people. So we must write 0 in the tens place in the quotient. Then on dividing 25 by seven, we get quotient 3 and the remainder is 4. Thus, the answer is quotient 703, remainder 4.

**Teacher** : Very good! Now divide 7439 by 9.

**Sarang** : It's difficult to do this mentally. I'll write it down on paper.
The quotient is 826 and the remainder, 5.

```
    0826
9) 7439
  - 0
   74
  -72
    23
   -18
     59
    -54
      5
```

**Teacher** : We use the same method to divide a four-digit number by a two-digit number. If necessary, we can prepare the table of the divisor before we start.

Study the solved examples shown below.

**Example (1)**

```
     0170
25) 4254
   - 0
     42
    -25
     175
   - 175
     0004
   - 0000
     0004
```

| | |
|---|---|
| $25 \times 1 = 25$ | |
| $25 \times 2 = 50$ | |
| $25 \times 3 = 75$ | |
| $25 \times 4 = 100$ | |
| $25 \times 5 = 125$ | |
| $25 \times 6 = 150$ | |
| $25 \times 7 = 175$ | |

Quotient 170, Remainder 4

**Example (2)**

```
     0305
32) 9783
   - 0
     97
    -96
     18
   - 00
     183
   - 160
      23
```

| | |
|---|---|
| $32 \times 1 = 32$ | |
| $32 \times 2 = 64$ | |
| $32 \times 3 = 96$ | |
| $32 \times 4 = 128$ | |
| $32 \times 5 = 160$ | |
| $32 \times 6 = 192$ | |

Quotient 305, Remainder 23

टेस्ट सोडवा

## listen and understand.

**Revision**

3. Look at the picture. Read what it shows and say what will happen. Write down your answer.

चित्र पहा. वर्णन वाचा. पुढे काय होईल ते सांगा. तुमचे उत्तर लिहून काढा.



Mr Clean does not like the scribbling on the wall.

What will he do?



Mr Knocker wants to enter this house.

What will he do?



Manisha is hungry.

What will she do?



Manish is thirsty.

What will he do?



Dolly falls and hurts her knee.

What will her friends do?



Mr and Mrs Engineer are busy. Sheru wants to play.

What will happen?

It is about to rain.
What will they do?



Sunil is getting ready for school.



Daji is going to water the plants.



Vanitakaku has put the clothes on the clothes-line to dry.



Sundara is grazing.

वाचा व समजून घ्या.

# ४. पर्यावरणाचे संतुलन

टेस्ट सोडवा

## आपण काय शिकलो ?



- पृथ्वीवर असंख्य प्रकारचे सजीव आढळतात.
- पर्यावरणातील सजीव आणि निर्जीव घटकांचे एकमेकांशी संबंध असतात.
- वेगवेगळ्या प्रदेशांत वेगवेगळे प्राणी, वनस्पती आणि सूक्ष्मजीव आढळतात.
- पर्यावरणातील जलचक्र, वातावरणातील विविध वायुचक्रे, अन्नसाखळ्या यामुळे पर्यावरणातील संतुलन टिकून राहते. यांच्यामध्ये हजारो वर्षांपासून संतुलन कायम राहिलेले आहे.

## स्वाध्याय

१. **काय करावे बरे ?**
कीटकनाशक न वापरता धान्यातील किडे घालवायचे आहेत.

२. **जरा डोके चालवा.**
अन्नसाखळी तयार करा;
बेडूक, घार, अळी, साप, गवत.

३. **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**
(अ) अन्नसाखळी म्हणजे काय ? उदाहरण लिहा.
(आ) पर्यावरणाचे संतुलन कसे राखले जाते ?

४. **वनस्पतींच्या वाढीसाठी जमिनीतील कोणत्या पदार्थांचा वापर आवश्यक आहे ?**

५. **चूक की बरोबर ते लिहा.**
(अ) पर्यावरणात सूक्ष्मजीवांचा समावेश होतो.
(आ) जैवविविधता जपणे आवश्यक आहे.
(इ) नाकतोडा पक्ष्याला खातो.

**उपक्रम**
१. आपल्या अवतीभोवती आढळणाऱ्या पक्ष्यांची माहिती मिळवा.
२. पर्यावरण संतुलनावर आधारित घोषवाक्ये तयार करा.

* * *

वाचा व स्वाध्याय सोडवा. **३. पृथ्वीवरील सजीव** सराव

टेस्ट सोडवा

## स्वाध्याय

**१. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) एकपेशीय सजीव पाहण्यासाठी कशाची गरज असते?

(आ) एकपेशीय सजीव कसे निर्माण झाले?

**२. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) सूर्य आणि सूर्याभोवती फिरणारे ग्रह कसे निर्माण झाले ?

(आ) प्राण्यांची दोन वैशिष्ट्ये लिहा.

**३. पुढील चौकटीत लपलेल्या पाच ग्रहांची नावे शोधून त्यांभोवती गोल करा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| र | वी | ळ | ग | मं |
| बु | न | टो | हू | रा |
| सू | ध | च्यू | प्लू | द्र |
| शु | क्र | र्य | प | चं |
| यु | रे | न | स | ने |

**४. पुढील घटना कालानुक्रमे लिहा.**

(अ) पृथ्वीवर जलाशयांची निर्मिती झाली.

(आ) सूर्य आणि सूर्याभोवती फिरणारे ग्रह निर्माण झाले.

(इ) अनेक प्रकारचे एकपेशीय सजीव निर्माण झाले.

(ई) तप्त वायू आणि धूळ यांनी मिळून बनलेला एक प्रचंड मोठा गतिमान ढग अवकाशात निर्माण झाला.

**कृती**

विविध आकारांच्या चेंडूंच्या साहाय्याने सूर्यमालेची प्रतिकृती तयार करा.

**उपक्रम**

जवळच्या प्राणिसंग्रहालयास भेट द्या किंवा तुमच्या परिसरात आढळणाऱ्या प्राण्यांची यादी करा व त्यांची वैशिष्ट्ये लिहा.

**हे तुम्हांला माहीत आहे का ?**

पृथ्वीखेरीज 'मंगळ' ग्रहावर जीवसृष्टी अस्तित्वात असण्याची शक्यता काही शास्त्रज्ञांना वाटत आलेली आहे. असे असले, तरी त्याविषयीचे निश्चित तथ्य अजून पुढे आलेले नाही. पृथ्वीप्रमाणेच मंगळाच्या पृष्ठभागावर ज्वालामुखी पर्वत, दऱ्या, वाळवंट आणि बर्फाने आच्छादित असणारे ध्रुवीय प्रदेश आहेत. तेथील कर्ब-द्विप्राणील वायूचे प्रमाण जवळजवळ ९५% आहे. मंगळावर अतिसूक्ष्म प्रमाणात प्राणवायू, पाणी आणि इतर काही वायू यांचे अस्तित्व आढळल्यामुळे तेथे सजीवांचे अस्तित्व असण्याची शक्यता पुढे आली. तेथील मातीमध्ये वनस्पतींच्या वाढीसाठी आवश्यक असणारे घटक उपस्थित असल्याचेही आढळले आहे. हे सर्व लक्षात घेऊन मंगळावरील सजीवांच्या अस्तित्वाबाबत शास्त्रीय संशोधन सुरू आहे. सजीवांचे अस्तित्व टिकून राहण्यासाठी द्रवरूप पाण्याची आवश्यकता असते. मंगळाचा ध्रुवीय प्रदेश बर्फाने आच्छादलेला असला, तरी तिथे द्रवरूपातील पाणी फारसे नाही.

साहित्य आणि चित्रपट यांच्याद्वारे 'मंगळावरचा माणूस' ही कल्पना खूप लोकप्रिय झाली, परंतु आतापर्यंतच्या शास्त्रीय संशोधनातून त्या कल्पनेला पुष्टी मिळालेली नाही.

५ नोव्हेंबर २०१३ रोजी भारताने अवकाशात 'मंगळयान' पाठवले आणि ही मोहीम २४ सप्टेंबर २०१४ रोजी यशस्वी झाली. ही एक ऐतिहासिक घटना आहे.

रियाज

टेस्ट सोडवा


● सुनो और अभिनय करते हुए गाओ :




## ९. नीम



ना मैं डॉक्टर, ना मैं ओझा,
ना मैं वैद्‌य–हकीम ।
मैं तो केवल एक पेड़ हूँ,
नाम है मेरा नीम ।




मेरी सूखी पत्ती डालो,
ऊनी कपड़े, अनाज बचा लो ।
सुखी पत्ती के धुएँ से,
मक्खी–मच्छर दूर भगा लो ।



घनी पत्तियों के कारण,
शीतल है मेरी छाया ।
गरमी और थकान मिटी,
जो मेरे नीचे आया ।



नहीं काटना मुझको तुम,
मैं इतने सुख दे देता ।
सूरज की किरणों से मिलकर,
हवा शुद्‌ध कर देता ।



सूरज, तारे, धरती, चाँद की,
जब तक चले कहानी ।
हमेशा सबको सुख देने की,
है मैंने मन में ठानी ।

*– लता पंत*



**कोष्ठक में दिए वर्णों से रिक्त स्थान भरो : (ड़े, णों, की, ना, मैं, थ, सू, हा, कि )**

— ने, कप — , ह — म, अ — ज, — कान, —रज, क — नी, — र — ।

❑ उचित हाव–भाव, लय–ताल के साथ कविता का वाचन करें । विद्‌यार्थियों से साभिनय मुखर वाचन करवाएँ । भूत–प्रेत, ओझा जैसे अंधविश्वास पर चर्चा करते हुए विद्‌यार्थियों को इनसे दूर रहने और वैज्ञानिक दृष्टिकोण अपनाने के लिए कहें ।

# माझा ऑनलाईन अभ्यास

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| पाचवी मराठी | पाचवी गणित | सेमी गणित | पाचवी इंग्रजी | पाचवी प.अ-1 | पाचवी प.अ-2 | हिंदी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे    वेब स्त्रोत-'ई-बालभारती'    सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in